RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक ३५] मंगळवार, जुलै २३, २०१९/श्रावण १, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ५९**

**प्राधिकृत प्रकाशन**

## जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून

### शुद्धिपत्र

क्रमांक उपजि/भूसं/कार्या-९/प्र.क्र. ६६१/२०१९.— ज्याअर्थी, भूसंपादन अधिनियम, १८९४ हा दिनांक १ जानेवारी २०१४ पासून निरसित झाला आहे. तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील उक्त १८९४ च्या अधिनियमाच्या संदर्भास तात्काळ प्रभाव दिला नाही ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ चे उप कलम २ मध्ये भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ६ बाबतच्या शब्दसंदर्भातील दुरुस्तीस तात्काळ प्रभाव दिला नाही. ज्याअर्थी, भूसंपादन अधिनियम, १८९४ हा निरसित झाल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तदनुषंगिक बदलास तात्काळ प्रभाव देणे अनिवार्य आहे. म्हणून सदरहू निरसित झालेल्या १८९४ च्या भूसंपादन अधिनियमाच्या अनुषंगाने सदर अधिनियम निरसित झाल्यानंतर केलेली कुठलीही कार्यवाही ही पूर्ववत करणे आवश्यक आहे ;

आणि त्याअर्थी, क्रमांक अजि/भूसं/कार्या-९/प्र.क्र. ६६१/१०, दिनांक १ फेब्रुवारी २०११ अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक–(को.वि.पु.), असाधारण क्रमांक ४८ दिनांक २८ मार्च २०१४ मध्ये पृष्ठ क्रमांक १ ते ४ वर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून दिनांक २८ मार्च २०१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेमध्ये व जि/भूसं/कार्या-९/एलएक्यू-८११/२०१५, क्रमांक अजि/भूसं/कार्या-९/प्र.क्र. ६६१/१०, दिनांक १ फेब्रुवारी २०११ अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक–(को.वि.पु.), असाधारण क्रमांक ५७, दिनांक २१ ऑगस्ट २०१५ मध्ये पृष्ठ क्रमांक १ ते ४ वर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध झालेल्या शुद्धिपत्रकामध्ये केलेली दुरुस्ती खालीलप्रमाणे वाचावी :—

### करीता

त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमिसंपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक) यापुढे उक्त “ संपादन अधिनियम” म्हणून संबोधिलेला अधिनियमाच्या कलम ६ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा असे घोषित करतात की, उक्त जमिनी सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

**वाचा**

त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ यापुढे उक्त "संपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला अधिनियमाच्या कलम १९ (१) अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा असे घोषित करतात की, उक्त जमिनी सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे. तसेच ज्याअर्थी, दिनांक २९ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध झालेल्या **शासन राजपत्रातील**, शासनाच्या नगरविकास विभागाकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (दुसरी दुरुस्ती) अध्यादेश, २०१५ मध्ये नमूदनुसार उक्त "संपादन अधिनियम" मधील कलम ४ ते १५ मधील नमूद कार्यपद्धती सदर प्रस्तावास लागू ठरणार नाही.

**सचिन कुर्वे,**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

मुंबई,
दिनांक १५ जुलै २०१९.

## BY THE COLLECTOR, MUMBAI SUBURBAN DISTRICT

*CORRIGENDUM*

No. DC/L.A./Desk–9/CR.661/2019.— Whereas, the Land Acquisition Act, 1894 repealed with effect from 1st January 2014. However the reference to the said Act of 1894 was not changed in the Maharashtra Regional and Town Planning Act ,1966 with immediate effect ;

And whereas in sub-section (*2*) of section 126, the amendment to the words section 6 of Land Acquisition Act, 1894 did not take immediate effect. Since the Land Acquisition Act, 1894 is repealed, it is mandatory to give effect in Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 with immediate effect. Therefore, any action taken with reference to the repealed Act i.e. Land Acquisition Act, 1894 after its repeal needs to be undone ;

Now therefore, No.C/Desk-IX/LAQ/CR-661/ 2010, dated 1st February 2011, The Correction made to the Notification dated 28th March 2014 published in *Maharashtra Government Extraordinary Gazette,* Part-I (K.D.S.), Extraordinary No. 48, dated 28th March 2014 by the Collector, Mumbai Suburban District on page No. 1 to 4 and to the Corrigendum No. C/Desk-IX/LAQ/CR-661/2010, dated 21st August 2015 published in *Maharashtra Government Extraordinary Gazette,* Part-I (K.D.S.), Extraordinary No. 57, dated 21st August 2015 by the Collector, Mumbai Suburban District on page No. 1 to 4 should be read as follows :—

*For*

Now, therefore, in exercise of the delegated power and under sub-section (*4*) of the section 126 of the said Maharashtra Act, read with section 6 of the Land Acquisition Act, 1894 (1 of 1894) (hereinafter referred to as the "said acquisition Act") the Collector, Mumbai Suburban District hereby declares that the said land, are needed for the said Public purpose.

*Read*

Now, therefore, in exercise of the delegated power and under sub-section (*4*) of the section 126 of the said Maharashtra Act read with section 19 (*1*) of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (hereinafter referred to as the "said acquisition Act") the Collector, Mumbai Suburban District hereby declares that the said land, are needed for the said Public purpose. Whereas, the Government in Urban Development Department under, Maharashtra Regional and Town Planning (Second Amendment) Ordinance, 2015, *Government Gazzatte,* dated 29th August 2015 mentioned that the procedure specified in sections 4 to 15 of the "Said Acquisition Act, 2013" shall not be applicable to this land.

SACHIN KURVE,
Collector,
Mumbai Suburban District.

Mumbai,
dated the 15th July 2019.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.